शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यू.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal)
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष-नववे : जोडअंक-एकवीस आणि बावीस : जानेवारी ते जून २०२०

## मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय

दिनांक १ व २ फेब्रुवारी, २०२०



## सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)
ता. कराड जि. सातारा
राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा)

* वीरशैव संप्रदाय आणि श्रीबसवेश्वरांचे कार्य
  डॉ.सुभाष जाधव — ४०[illegible]
* लिंगायत धर्माचे तत्त्वज्ञान
  डॉ. मांतेश हिरेमठ — ४११
* युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वरांचे प्रेरणादायी वचन साहित्य
  संगीता आरळी — ४१६
* महात्मा बसवेश्वरांच्या बसववचनातील स्त्रीविषयक जाणिवा
  प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे — ४२०
* शिवशरणी अक्कमहादेवी यांच्या वचनसाहित्यातील विचारतत्त्वे
  डॉ. दत्ता पाटील — ४२३
* मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील समर्थ संप्रदायाचे अवलोकन
  डॉ. शिवाजी पाटील — ४२७
* समर्थ संप्रदाय
  डॉ. शर्मिला घाटगे — ४३०
* समर्थ संप्रदाय
  प्रा.महेश कुलकर्णी — ४३४
* रामदासांचा समर्थ संप्रदाय
  डॉ. वैशाली औताडे — ४३७
* समर्थ संप्रदाय: तत्त्वज्ञान आणि वाङ्मय
  प्रा.अंकुश घुले — ४४०
* मनाच्या आरोग्यासाठी मनाचे श्लोक
  डॉ.संग्राम थोरात — ४४४
* रामदासांची लोकशिक्षकाची भूमिका
  डॉ. सविता माळी — ४४७
* वेणाबाई ते वेणास्वामी
  डॉ. रेश्मा दिवेकर — ४५२
* गुरू नानकदेवजींचा पुरोगामी दृष्टीकोन
  डॉ.सुभाष वाघमारे — ४५६
* मुस्लिम आणि ख्रिस्ती संतांचे योगदान
  डॉ. बाळासाहेब चव्हाण — ४६१
* 'मुडलगी संप्रदायातील मराठी संत कवयित्री- राधाबाई'
  डॉ. धनंजय होनमाने — ४६६
* चिमड संप्रदायाच्या प्रचार व प्रसारासाठी साहित्यसंपदेचे योगदान
  नारायण आपटे, — ४६९
* नागेश संप्रदाय आणि अज्ञानसिद्धांच्या साहित्यातील समाज-संस्कृती दर्शन
  डॉ. देवीदास गायकवाड — ४७२
* आनंदसंप्रदाय आणि त्यांचे वाङ्मय
  डॉ. बाळकृष्ण शिंदे — ४७६

# रामदासांची लोकशिक्षकाची भूमिका

**डॉ. सविता माळी**
मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव

संतमालिकेत समाविष्ट होणारे, परंतु स्वतंत्र असा संप्रदाय निर्माण करणारे रामदास हे सोळाव्या शतकातील आगळे-वेगळे कवी आहेत. 'संत' आणि 'समर्थ' अशी दोन रुपे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात निदर्शनास येतात. समाजकारण, राजकारण, धर्म, अर्थ, शिक्षण, भाषा व संस्कृती इ. अष्टांगावर त्यांनी प्रकाश टाकला आहे.

इ.स. १६६० पर्यंत महाराष्ट्र मुसलमानी वर्चस्वाखाली होता. या काळात अस्मानी-सुलतानीचे संकट आले होते. लोकांवर अन्याय-अत्याचार होत होते. समाज खचला होता. अशावेळी खचलेल्या समाजाला परमार्थ, सहिष्णुता व धर्म सांगण्याऐवजी सावरण्याची गरज होती. त्यांना लढण्याची प्रेरणा देण्याची गरज होती. अन्यायाविरुध्द आवाज उठवायचा असेल तर सर्वप्रथम मन, मस्तक आणि मनगट सामर्थ्यशाली बनवायला हवे. ही समाजवास्तवता पाहून समर्थाचे मन अस्वस्थ झाले.

रामदासांनी बारा वर्षे भ्रमंती केल्यानंतर समाजाची भयानक दैन्यावस्था त्यांच्या लक्षात आली. प्रतिकारशून्य समाज त्यांच्या चिंतनाचा विषय बनला. देव, देश आणि धर्म यांचे वास्तवभान त्यांना देशाटनातून आले.

'विप्री खंडिला आचार । क्षेत्री (क्षत्रियांनी) सांडिला विचार ।।
लोक दोष आचरती । तेणे दोषे भस्म होती ।।

समाजाला या भयानक परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी लोकांना समर्थ्यांनी उपदेश केला आहे.

**रामदासांचे प्रपंच विज्ञान**

समर्थ्यांच्या प्रपंचाविज्ञानाला केवळ वैयक्तिक असून सामाजिक आशयही होता. केवळ व्यष्टीच्या प्रपंचाची चिंता नव्हती, तर व्यष्टीचा प्रपंचही जिच्यावाचून होत नाही. त्या समष्टीच्यीही चिंता होती. आणि त्यांच्या काळात सर्वत्र माजलेल्या अविवेकी समत्वबुध्दीचे खूळ मोडून टाकून त्याजागी सारासार विवेक बाळगणाऱ्या चार्तुर्यबुध्दीची आणि विचक्षणेची प्रस्थापना करण्याची त्यांना उत्कंठा होती. एका व्यापक अर्थाने त्यांच्या पूर्वीच्या संतांनी सांगितलेल्या विश्व-कुटुंबवादाचा आणि त्याच्यातून निर्माण झालेल्या प्रतिकारशून्य निवृत्तीवादाचा उच्छेद करण्याचा जरी नसला तरी त्याला तारतम्याची आणि व्यवहाराची मर्यादा घालण्याच्या त्यांच्या मोठ्या कार्याचाच एक अवश्य आणि अपरिहार्य भाग होता.

महाराष्ट्राच्या उत्तम क्षेत्रात इतकी वर्षे निवृत्तीचे मळे हे संत एकसारखे लावीत होते, जे पेरावे ते उगवते. निवृत्तीच्या झाडांना प्रवृत्तीची फळे कोठून येणार ? तुळस कितीही पवित्र झाली, तिची लावणी कितीही भक्तिभावाने केली तरी ती आंब्याचे किंवा बांबुचे कार्य करील काय ? बसायला सावली किंवा टेकावयाला काठी तिच्यापासून कधीही प्राप्त होणार नाही.

त्याचप्रमाणे हे संतगुरु आणि त्यांचा उपदेश उपयोगी पडण्यासारखा नाही हे रामदासांच्या लक्षात आले; व नामरसायन ही कितीही गुणीमात्रा असली तरी जडलेल्या रोगाला काही विशेष अनुपानावाचून ती कुचकामी आहे असे त्यांना दिसले. त्यामुळेच प्राणिजात सर्व सारखेच हा उपदेश त्यांना पटला नाही.

समर्थ निवृत्ती आणि प्रवृत्ती त्यांचा मेळ घालणारे संत होते. हरिकथा निरुपणाबरोबर येणारा निवृत्तीवाद त्या काळातील आव्हाने पेलण्यासाठी त्यांना पुरेसा वाटला नाही. म्हणूनच त्यांनी प्रवृत्तीचा पुरस्कार केला. समकालीन समाजबांधवांना प्रयत्नवाद शिकविला. त्यांचा विवेक जागा करण्याचा प्रयत्न केला. समर्थ सांगतात, परमार्थ करावा पण परमार्थाचे ध्यान विवेकपूर्ण असावे कारण,

प्रपंच सोडून परमार्थ कराल । तेथे तुम्ही कष्टी व्हाल ।।

प्रपंचाइतकीच परमार्थाचीही आवश्यकता त्यांनी तेवढ्याच आग्रहाने प्रतिपादली आहे. प्रपंचावर लाथ मारुन परमार्थ करणारे होऊन गेले. त्यांचा निषेध म्हणून लाथ मारुन प्रपंच करणाऱ्यांना त्यांनी केवळ मुर्खांची पदवी दिली आहे.

'आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।
येथे आळस करु नका । विवेक हो ।।'

माणसांच्या ऐहिक आणि आध्यात्मिक विकासासाठी प्रपंच आणि परमार्थ ह्या दोघांचीही जरुरी त्यांना सारखीच वाटत होती. त्यामुळे परमार्थाचा निरास करण्याची कल्पना त्यांना शिवली नाही. प्रपंचाइतकीच परमार्थाचीही आवश्यकता त्यांनी तेवढ्याच आग्रहाने प्रतिपादली आहे. रामदासी संप्रदायात हरिकथा निरुपण म्हणजे अर्थातच संप्रदायसिध्द रामोपासना होय. आतापर्यंतच्या कोणत्याही संप्रदायात राजकारणाला म्हणजे प्रपंचविज्ञानाला परमार्थाच्या बरोबरीने स्थान दिल्याचे दिसून येत नाही. ही प्रपंचाची व परमार्थाची एकवाक्यता हे दासबोधाचे व रामदासी संप्रदायाचेच केवळ वैशिष्ट्य आहे.

**रामदासांचे लोकसंघटनाचे तत्त्वे**

सर्वत्र अनिवार परसरलेल्या निवृत्तिवाद, समातावादी आणि संन्यास-प्रवण, सर्व सहिष्णू अशा हिंदुसमाजात असे जयिष्णू, प्रवृत्तिवादी व प्रपंचसन्मुख तत्त्वज्ञान सांगणारे रामदास हे त्या काळातील एक ठळक अपवाद म्हणावे लागतील. रामदासांनी हे तत्त्वज्ञान केवळ ग्रंथरुपाने सांगितले नाही तर त्यासाठी त्यांनी भक्तमंडळ्या, संतमंडळ्या आणि राजकारणासाठी उंदड समुदाय करावे असे मंडळीकरणाचे तत्त्व सांगितले. कारण व्यक्ती कितीही कर्तबगार असली तरी ती काही अमर नसते. याकरिता कार्याचे सातत्य व अखंडता राहावयाची असेल तर मंडळीकरण होणे जरुरी आहे.

आपण अवचित मरोन जावे । मग भजन कोणे करावे ।
या करणे भजनास लावावे । बहुत लोक ।।

असे त्यांचेच शब्द आहेत. कारण हिंदुसमाजाची प्रकृती तेव्हा काय आणि आताही काय, तुटक, संन्यस्त, एकदेशी निवृत्त, समाजपराङ्मुख, राष्ट्रपराङ्मुख व व्यक्तिनिष्ठ अशीच आहे. अशा या व्यक्तिनिष्ठ समाजात मंडळीकरणाचे म्हणजे संस्थात्मक जीवनाचे बीजारोपण रामदासांनी त्या काळी केले. या मंडळीकरणाच्या विचाराचे परमोच्च स्वरुप म्हणजे रामदासांनी केलेली


ISSN No. 2319-6025

मठस्थापना आणि समूर्त करण्याची साधना होती आणि रामदासी महंत हा त्या संप्रदायातला मुख्य दुवा होता.

**रामदासांची नीतिधर्माची शिकवण**

साधकांना मार्गदर्शन करण्यासाठी रचलेला ग्रंथ म्हणजे मनाचे श्लोक. चंचल द्वाड अवखळ असणाऱ्या मनाला समर्थ 'सज्जन' अशी उपाधी देतात. नैतिक शुध्दतेचे अधिष्ठान असलेली भक्ती ही मनाच्या श्लोकातील प्रतिपाद्य विषय आहे. समर्थाचे 'मनाचे श्लोक' हा मानव समाजाला मिळालेला अनमोल ठेवाच आहे. तो समाजातील सर्व थरातील व्यक्तींना मार्गदर्शक आहे. मन हेच मानवाच्या सुखःदुखाचे कारण आहे. मनाला योग्य वळण लावल्याशिवाय कल्याण साधता येणार नाही. असे समर्थ म्हणतात.

मना सज्जना भक्ती पंथे चि जावें । तरी श्रीहरी पाविजतो स्वभावे ।

मानवी मन स्वच्छ करण्यासाठी मनाच्या म्हणजेच विचारांच्या स्वच्छतेची गरज आहे. त्यासाठी निंद्य ते सर्व सोडावे व वंदनीय ते सर्व मनोभावे करावे. असा सल्ला देतात. आपल्या स्वार्थासाठी दुसऱ्यांना दुःखी करु नये, मनात दुष्ट वासना बाळगू नये, पापी विचार सोडून द्यावेत. काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर, हे दुःखदायकच आहेत. हे षड्रिपू आपले शत्रू आहेत. कारण त्यामुळेच आपला संताप वाढतो. बुध्दीचा तोल सुटत जातो. आणि असंतुलित बुध्दी सर्व नाशाचे कारण ठरते.

मना मानसी दुःख आणू नकोरे । मना सर्वथा शोक चिंता नको रे ।

हे मना, तू अंतर्यामी दुःखाचा विचार आणू नकोस, सतत शोक, चिंता करीत बसू नको रे. देहाचे भान विसरुन , देहापासून मिळणाऱ्या सुख-दुःखांना पार करुन मुक्तीचा आनंद प्राप्त करुन घे कारण शरीर हे नश्वर आहे. शरीरापासून मिळणारे सुख क्षणिक आहे. क्षणिक सुखासाठी देहाला दुःख देऊ नको. असा इशारा समर्थ देतात. सच्चिदानंदरुप परमात्मा हा संपूर्ण सुखाचा, शाश्वत सुखाचा साठा आहे.

जगी सर्व सुखी असा कोण आहे । विचारें मना तूंचि शोधूनि पाहे ।

हे मना ! या जगात सर्व सुखांनी परिपूर्ण असा कोण आहे ? प्रत्येकाला आपल्या पूर्वसंचिताप्रमाणे भोग भोगणे क्रमप्राप्त आहे. प्रत्येकाच्या जीवनात काही ना काही विवंचना असतेच. या विवंचनापाठीमागे आपले कर्मच कारणीभूत आहे. 'करावे तसे भरावे' या न्यायाने तुम्ही जर चांगले कर्म केले तर आयुष्यात सुख येईल व वाईट कर्म केले तर दुःख येईल. सुखी जीवनाचा मंत्र समर्थ सांगतात, 'मना सज्जना भक्पिंथेची जावे', 'जनी वंद्य ते सर्व स्वीकारावे', 'स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे', 'सत्य सोडू नये', 'मिथ्या भांडू नये', 'खोट्याची तरफदारी करु नये', 'खऱ्याकडे कानाडोळा करु नये', मनाच्या श्लोकमध्ये नीतिमय जीवनाचा आदर्श समजावून सांगणारी जीवनदृष्टी आहे.

**रामदासांचे राजकीय विचार**

व्यक्तीच्या प्रपंच आणि परमार्थाबद्दल रामदासांच्या विचाराबरोबरच राजकीय विचाराचे चिंतन लोकांना मार्गदर्शक असेच आहे. समाजाशिवाय व्यक्ती अस्तित्वात राहूच शकत नाही. त्यामुळे रामदास जो प्रपंच सांगतात. तो म्हणजे समाजाचा प्रपंच. व्यक्ती आणि समाज या दोघांचेही भवितव्य राज्यसंस्थेवर अवलंबून आहे. त्यामुळे देशात राजा कोण


ISSN No. 2319-6025

आहे; त्याचाही विचार व्यक्तीला व सामाजाला करणे भाग आहे.

रामदासांनी लोकांना प्रपंचाची सनद दिली. समर्थांनी व्यवहार विवरुन सांगितले आणि प्रपंच विज्ञान रचिले. हेच त्यांचे राजकारण होय. राजकारण म्हणजे शिवाजी महाराजांना मदत करणे, लोकांचे संघटन करणे, गुप्तपणे कामे करण्याची शिकवण देणे. अशा अर्थाबरोबरच दुसराही अर्थ अपेक्षित आहे. तो म्हणजे या राजकारणाची जननी जी प्रवृत्ती ही होय. तिचेच पुनरुत्थान त्यांच्या हस्ते झाले. राजकारण प्रवृत्तिवादातून उद्‌भवते, पण तो वादच संतांनी आणि तत्वज्ञानी लोकांनी निवृत्तिवादाच्या ओसाड व निश्चल वैराण भूमीकडे पिटाळत नेला होता. तो परत आणण्याचे काम रामदासांनी केले म्हणून राजकारणांनी उत्थान भूमी जी प्रपंचबुध्दी तीच उच्छिन्न होण्याच्या वाटेला लागली होती तिला नवजीवन देणे हे राजकारण होऊन बसले होते.

रामदासांचे राजकारणही असेच व्यापक अशा तात्त्विक आणि व्यावहारिक पायावर उभे आहे. रामदांची कविता ही मराठीतील पहिली राजकीय कविता आहे. एखाद्या राजकारण्याला मार्गदर्शक ठरतील अशी तत्त्वे रामदास सांगतात. राजकारणाला उच्च नैतिक आणि अध्यात्मिक आधार असावा ही रामदासांची अपेक्षा आहे. दासबोधाच्या अकराव्या दशकातील पाचव्या समासात 'राजकारण निरुपण' नावाचा एक वेगळा विभाग आहे. त्यात रामदासांनी आपले राजकारणाविषयीचे विचार व्यक्त केले आहेत. राजकारण्याच्या अंगी कोणते गुण असावेत याचा ऊहापोह केला आहे. राजकारण्याने अंतरी उदास असावे. न्यायनिती, शांती यांचे आचरण करावे, उपाधीची बाधा होऊ देऊ नये, त्यांने कीर्ती आणि वैभव याची अभिलाषा धरु नये. रामदासांच्या मते राजकारण केवळ भोगावर आधारलेले नसावे. त्यागावर असावे. समत्त्वबुध्दी हाही रामदासांच्या मते राजकारण्याचा उत्तम गुण आहे. त्याने दुजाभाव करु नये. त्याने सर्वांना समान लेखावे 'बहुतांची राखावी अंतरे' हा आदर्श मूलमंत्र आहे. दुर्जनावरही परोपकार करावेत. अशी दुर्जनांच्या विरोध मोडून काढण्याची युक्ती ते सांगतात. त्याने दुसऱ्याच्या दुःखात सहभागी व्हावे. त्यांच्या अंगी सोशिकता असावी. दुःखात सहभागी व्हावे त्यांच्या अंगी सोशिकता असावी. ' दुःख दुसऱ्याचे जाणावे । एकोन तरी वाटोन घ्यावे । बरे वाईट सोसावे । समुदायाचे' असे रामदास सांगतात. लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करावा. लोकांची भिती घालवावी. अशा रितीने लोकांना निर्भय करावे. निर्भय झालेले लोकच समाजात क्रांती घडवू शकतात. ते म्हणतात, 'राजकारण बहुत करावे । परंतु कळोच नेंदावे । परपीडेवरी नसावे । अंतःकरण । 'राजकारण करावे परंतु दुसऱ्यांना त्रासदायक राजकरण करु नये. राजकारणात खरा प्रश्न असतो तो दुर्जनांचा, त्याविषयीची निति कशी असावी हेही रामदास सांगतात. दुर्जनाशी संघर्ष न करण्याचा सल्ला ते देतात.

तीर्थयात्रेप्रसंगी समर्थांना दिसलेल्या उद्विघ्न समाजाचे चित्र या प्रकरणात आले आहे. समर्थ म्हणतात,

आता नाना तंटे बखेडे येथे माजले असून पृथ्वी गढाळली आहे. ब्राह्मण बुध्दीपासून चेवले आणि आचारभ्रष्ट झाले. पूर्वीची असंख्य देवस्थाने गेली. ग्रंथसंपदा नष्ट करण्यात आली आता म्लेंच्छ राजाच्या राज्यामुळे ठायी ठायी उरुस भरु लागले आहे.

' तीर्थ क्षेत्रे मोडली । ब्राह्मणस्थाने भ्रष्ट झाली

सकल पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।'

यासारख्या वर्णनातून त्या काळी समाजातील सुलतानी सारख्या संकटांनी माणून कसा हादरला होता हे स्पष्ट होते.

दासबोधाच्या शेवटच्या भागात म्हणजे एकोणिसाव्या दशकात पुन्हा रामदासांनी आपले राजकारणविषयक विचार विस्ताराने मांडले आहेत. राजकीय धोरणे आखताना नेहमीच जोखीम पत्करावी लागते. आणि जागरुकताही बाळगावी लागते. रामदासांची राजनीती मुत्सद्देगिरीवर आणि शहाणपणावर आधारलेली आहे. राजनीतीचे एक सूत्र रामदास सांगतात, 'कांटीने कांटी झाडावी । झाडावी परी तेन कळो नेदावी। कळकटेपणाची (भोळेपणाची) पदवी । असो द्यावी । ', युद्धामध्ये वेगवेगळ्या युक्त्यांचा वापर करताना आपल्या राजतीनीबद्दल गोपनियता पाळण्याचा सल्ला रामदास देतात. भोळेपणाची पदवी धारण करावी. असे ते सांगतात. थोडक्यात राजकारण्याने सर्वत्र असावे पण दिसू नये असे रामदास सांगतात. 'मुख्य सुत्र हाती घ्यावे कारणे ते लोकांकरवी करवावे' । असा सल्ला ते देतात. राजकारणात कारस्थानी लोकांचा उपयोग करुन घ्यावा. त्यांचा कौशल्याने आपल्या कामासाठी उपयोग करुन घ्यावा असा सल्ला देतात. हे सर्व करताना त्यातील धोक्याची कल्पना द्यायलाही ते विसरत नाहीत. कारस्थानी लोकांची संख्या वाढणे आणि त्यांचे राजकारणातील अवास्तव महत्त वाढणे हे राजकारण्याला अपायकारकच असते. म्हणून 'दुर्जन राजकारण दाटे । ऐसे न करावे ।' असा धोक्याचा इशारा रामदास देतात. तसेच या दुर्जनाचा निर्भयपणे योग्य तो समाचार घेतला पाहिजे असे आग्रहाने सांगतात. दुर्जनांच्याबाबतीत बळाऐवजी युक्तीचा वापर करण्याचा सल्ला देतात. 'दुर्जन प्राणि समाजावे । परि ते प्रगट न करावे । सज्जनापरीस आकळवावे । महत्व देऊनी ।' रामदास म्हणतात. दुर्जनास पारखावे पण प्रगट करु नये. सज्जनाप्रमाणे त्यांनाही महत्त्व देऊन त्यांच्याशी वागावे. आणि दुर्जनाची समस्या संपवून टाकावी. कारण असे कारस्थानी लोक समाजात मिसळले की राजाला अखंड कटकट होते. राजा कसा असावा हेही समर्थ सांगतात. राजाचा राज्यभर दरारा असावा, त्याला पाहताच दुर्जनाला धाक वाटला पाहिजे त्यामुळे बंड आणि पाखंड आपोआप शमते. जशास तसे हेही रामदांच्या राजनीतीचे एक महत्त्वाचे सूत्र आहे.

'हुंब्यासी हुंबा लाऊन द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा । लैंदास उभा करावा । दुसरा लैंद ।'असे मजेशीर सल्ला ते देतात. तसेच 'धटासी आणावा धट । उधटांशी पाहिजे उधट । खट नटासी खट नट । अगत्य करी' अशी पुस्ती ते जोडतात. हे सर्व करताना, राजकारण्याने स्वत:ला कोडे अडकवून घेऊ नये. अशी युक्ती समर्थ सांगतात. राजकारणाचा किती सांगोपांग विचार केला होता. हे या सर्व विवेचनावरुन दिसून येते.

* * * * * *